वादीतर्फे साक्षीदार क्र.१

**प्रतिवादी क्र.१ व २ व त्यांचे वकील श्री. जे.व्ही. धुमाळ यांचा वारंवार पुकारा करता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.३ तर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. गट क्र.१५७ मध्ये १ हे. ६९ आर जमीन ही सिमींताबाई हिच्या नावे वाटणीआधारे झाली होती. सदर वाटणी माझे वडील हयात असताना झालेली होती. वडील आणि चुलत्यांमध्ये वाटणी होत असताना १ हे. ६९ आर जमीन माझ्या वडीलांच्या नावे आली होती व सदर जमीन त्यांनी आईच्या नावे केली होती. सदर फेरवाटणीमध्ये माझ्या आईने ६० आर जमीन स्वतःकडे ठेवून उर्वरीत जमीन चुलत्याच्या नावे केली होती. चुलत्यांनी आईच्या नावे जमीन केल्याचा कोणताही लेखी दस्त माझ्याकडे नाही, परंतु आईने चुलत्याच्या नावे केलेल्या जमिनीचा दस्त माझ्याकडून असून तो मी दाखल करु शकतो. सदर ६० आर जमिनीपैकी माझ्या आईने ३० आर जमीन प्रतिवादी क्र.१ ला विक्री केली. सदर ३० आर जमीनीची चतुःसीमा दर्शवणारा कोणताही दस्त माझ्याकडे नाही. ३० आर जमिनीची मालकी माझ्या आईची असल्याचा दस्त मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१५७ मधील १ गुंठाही जमीन माझ्या ताब्यात नाही. गट क्र.१५७ चा जुना सर्वे नंबर मला आठवत नाही. जुन्या सर्वे नंबरचे गट क्र.१५७ व १५८ झाले आहे. सदर दोन्ही गटाची मोजणी झालेली आहे. गट क्र.१५७ व १५८ या गटातील एकनाथ जर्नाधन चामे यांना सोडून मी इतर धारकांना प्रकरणात पक्षकार म्हणून सामील केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१५७ मधील १ गुंठाही जमीन माझ्या ताब्यात नसताना मोजणी करुन जमीन ताब्यात मिळावी याकरीता मी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी माझ्या जमिनीवर अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१५७ मधील जमीन माझ्या ताब्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१५७ च्या ७/१२ उताऱ्यावर जेवढी जमीन जर्नाधन चामेच्या नावावर आहे तेवढीच त्याच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

**प्रतिवादी क्र.४ व त्यांचे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचा वारंवार पुकारा करता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.04.13 16:59:49 +0530

दि.१३/०४/२०२६

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.